# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट ३९४-२०२४** **दिनांक :- २४/१०/२०२४**

## “तडीपार करण्यात आलेल्या आरोपीस अटक करण्यास मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश”

इसम नामे मोहमद करीम शकील शेख,वय-३१ वर्षे, रा. गालानगर,बीजेपी कार्यालयाचे मागे, नालासोपारा पुर्व ता.वसई, जि.पालघर याचे विरुध्द आचोळे पो.स्टे.गुरक्र. ४१/२०२१ भादविसक ३२६,१४१,१४३,१४५,१४७,१४८,१४९ तसेच गुनोक्र. ३२४/२०२२ भादविसक ३०७, ३२६, ३२३, १४३, १४७, ५०४, ५०६ यासारखे शरीरा विरुध्द दोन गुन्हे दाखल असुन ते न्यायप्रविष्ठ आहेत. नमुद इसम हा त्याचे इतर ८ साथीदारासह टोळीने गुन्हे करीत असुन त्याचे साथीदाराविरुध्द सन २०१६ पासुन तुळीज, आचोळे पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. नमुद इसमास सदर गुन्हयात अटक होवुनही त्याचे गुन्हेगारी वृत्तीत बदल झालेला नसुन त्याचे समाज विघटीत कृत्यामुळे समाजाचे व आजुबाजुच्या परीसरात राहणाऱ्या नागरीकांच्या जिवीतास तसेच मालमत्तेस धोका नाकारता येणार नाही याकरीता मा.पोलीस उप आयुक्त, मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय, परीमंडळ क्र.०२ यांचे कार्यालयीन जा.क्र. पो.उपआ.परी.-२/हद्दपार-५५/मिश्रा व इतर-६/आदेश क्र.१/३८७१/२०२३, दि.२३.१०.२०२३ अन्वयेचे आदेशा प्रमाणे महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ५६,(१),(अ),(ब) प्रमाणे हद्दपार इसम नामे मोहमद करीम शकील शेख, वय-३१ वर्षे यास ठाणे जिल्हा, पालघर जिल्हा, नाशीक जिल्हा, मुंबई शहर, मुंबई उपनगरे या कार्यक्षेत्रातुन दोन वर्षाकरीता तडीपार करण्यात आलेले होते.

मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अविनाश अंबुरे यांनी विधानसभा निवडणुक अनुषंगाने कार्यक्षेत्रातील गंभीर गुन्हयातील पाहीजेत/फरारी तसेच तडीपार आरोपीचे शोधा करीता आदेश दिलेले होते.

दिनांक २३.१०.२०२४ रोजी पोहवा/राजाराम मधुकर काळे, पोहवा/संतोष बापु मदने, पोहवा/अकिल नामदेव सुतार असे गुन्हेगार वॉच पेट्रोलिंग फिरत असतांना आचोळे पोलीस ठाण्याचे हद्दीतील राजनगर सर्कल परिसरात आले असता १४.१० वाजताचे सुमारास राजनगर सर्कल येथुन रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या सार्वजनीक रोडवर एक इसम उभा असलेला दिसला त्यास पोहवा/राजाराम काळे यांनी ओळखून तो सद्या महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ५६,(१),(अ),(ब) प्रमाणे ठाणे जिल्हा, पालघर जिल्हा, नाशीक जिल्हा, मुंबई शहर, मुंबई उपनगरे या कार्यक्षेत्रातुन दोन वर्षाकरीता तडिपार करण्यात आले असतांना देखील नमुद आरोपी हा मा. वरीष्ठांनी दिलेल्या तडीपार आदेशाचा भंग करुन त्यास मनाई असलेल्या पालघर जिल्हातील नालासोपारा पुर्व परीसरात मिळून आल्याने त्याचे विरुध्द तुळींज पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आलेली आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री.अविनाश अंबुरे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पो. निरीक्षक राहुल राख, पोनिरी. धनंजय पोरे, सपोनि. नितीन बेन्द्रे, दत्तात्रय सरक, पोउपनिरी. हितेंन्द्र विचारे, सफौ.श्रीमंत जेधे, मनोहर तावरे, आसीफ मुल्ला, पोहवा. राजाराम काळे, संतोष मदने, अनिल नांगरे, प्रविण पवार, राजविंर संधु, हनुमंत सुर्यवंशी, संग्राम गायकवाड, सतिष जगताप, महेश वेल्हे, शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, पोशि. अंकीत सुतार, नितीन राठोड, साकेत माघाडे, अंगद मुळे, मसुब सचिन चौधरी सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी यशस्वी कामगिरी केली आहे.